# एस. एच. बिहारी - भाग २



ओ. पी. नय्यर यांच्यासाठीही त्यांनी खूप गाणी लिहिली. ते त्यांना अधून मधून आपल्या चित्रपटांसाठी अक्षरशः उचलून आणीत असत. 'बहुत शुक्रिया बडी मेहेरबानी' (रफी-आशा), 'मुझे देखकर आपका मुस्कुराना' (रफी), 'तुम्हे मोहब्बत है हमने माना' (आशा-रफी), ही 'एक मुसाफिर एक हसीना' या चित्रपटातील रसिकप्रिय गाणी त्यांचीच. त्यानंतर 'काश्मीर की कली' चित्रपटातील सर्वच्या सर्व नऊ गाणी श्रोत्यांची इतकी लाडकी आहेत की इथे त्यांचा उल्लेख न करून चालणार नाही. 'किसी ना किसी से कभी ना कभी' (रफी), 'दिवाना हुआ बादल' (रफी व आशा), 'ये चाँद सा रोशन चेहरा' (रफी), 'इशारों इशारों मे दिल लेनेवाले' (आशा व रफी), 'सुभानल्ला हाये!' (रफी), 'हाये रे हाये, ये मेरे हाथ मे तेरा हाथ' (रफी व आशा), 'बलमा खुली हवा मे' (आशा), 'है दुनिया उसीकी, झमाना उसीका' (रफी) व 'फिर ठेस लगी दिल को, फिर याद ने तडपाया' (आशा). 'काश्मीर की कली' हा चित्रपट म्हणजे रसिकांच्या दृष्टीने अभूतपूर्व गाण्यांचा खजिनाच म्हणायला हवा.

त्यानंतर त्यांनी गुरुदत्तच्या 'बहारे फिर भी आयेंगी' या चित्रपटासाठी भावनांचे चढउतार दर्शविणारे 'वो हँसके मिले हमसे, हम प्यार समझ बैठे' हे उदास गाणे ओ. पी. नय्यर यांच्यासाठीच लिहिले होते. नंतर पुन्हा 'जरा होले होले चलो मोरे साजना' (आशा), 'मेरी जान तुमपे सदके' (आशा, महेन्द्र), 'आज कोई प्यार से दिल की बाते कह गया' (आशा) ही 'सावन की घटा' चित्रपटातील गाणी त्यांचीच आहेत. 'सी आय डी' मध्ये नय्यर यांनी त्यांना दोन गाणी दिली होती. पण ती खास उल्लेखनीय नव्हती. परंतु नय्यर यांच्या 'दिल और मोहब्बत' चित्रपटातील 'कहाँ से लायी हो जानेमन ये किताबी चेहरा गुलाबी आँखे' (महेन्द्र आणि आशा) हे त्यांचे गाणे मात्र दखल घेण्याजोगे होते.

'दुनिया' चित्रपटातील 'दुनिया इसी का नाम है' (शारदा-मुकेश) हे शंकर-जयकिशनसाठी लिहिलेले गाणे तसेच 'हमसाया' मध्ये ओ. पी. नय्यर यांच्यासाठीचे 'आजा मेरे प्यार के सहारे अभी अभी' (आशा) ही गाणी त्यांनीच दिलेली होती. 'तुम्हारा चाहने वाला' (महेन्द्र, आशा) आणि 'जब आही गया है द्वार

पे तेरे’ (आशा, महेन्द्र, शंकर दासगुप्ता व बद्री पवार) यांनी म्हटलेली कव्वाली यांसह ‘कही रात कही दिन’ या चित्रपटातील सर्वच्या सर्व गाणी ओ. पी. नय्यर यांनी त्यांनाच दिली होती. तसेच बिहारी यांनी एन् दत्ता यांच्यासाठीही ‘इन्स्पेक्टर’ चित्रपटासाठी काही मजेदार गाणी लिहिली होती. ती म्हणजे ‘मरहबा ऐ हुस्न ए यार मरहबा’ (आशा) आणि ‘बुरा तुम ना मानो तो इक बात कह दूँ’ (रफी आशा).

काही गीतकार असे आहेत की त्यांनी आपल्यासाठी खूपच लाजवाब गाणी दिली, परंतु त्यांच्या या योगदानाच्या प्रमाणात ते मात्र अप्रसिध्दच राहिले. या गीतकारांमध्ये एस. एच. बिहारी यांची गणना करता येईल.

इशारों इशारों मे दिल लेनेवाले
बता ये हुनर तुने सीखा कहाँसे ?
निगाहो निगाहों मे जादू चलाना
मेरी जान सीखा है तुमने जहाँसे

यासारखे भावमधुर सदाबहार गीत एस. एच. बिहारी यांच्याखेरीज दुसरा कुठलाही गीतकार लिहूच शकत नाही.

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history

and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician's role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book "Talat Mahmood, The Velvet Voice" was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com